राज्यातील अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्रात मूलभूत / पायाभूत सुविधा करिता सन २०१७-१८ मधील मंजूर कामात बदल करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन शुध्दीपत्रक क्रमांक: ग्राक्षेवि - २०१७/प्र.क्र.१०१/भाग-१/का.९
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- १२ फेब्रुवारी, २०१८.

वाचा :- शासन निर्णय,अल्पसंख्याक विकास विभाग, ग्राक्षेवि- २०१७/प्र.क्र.१०१/का.९, दि.११ डिसेंबर, २०१७.

शासन शुध्दीपत्रक :-

संदर्भाधीन शासन निर्णयासोबत असलेल्या परिशिष्ट "अ" मधील अ.क्र.७ **परिशिष्ट "अ"** मधील **अ. क्र. ७** येथील ग्रा.पं. धारंवटा, ता. गेवराई, जिल्हा बीड येथे शादीखाना बांधणे या मंजूर विकासकामांना दिलेली मंजूरी रद्द करण्यात येत असून जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे सन २०१७-१८ करिता उपरोक्त पूर्व मंजूर विकासकामांचा निधी अखर्चित आहे, तसेच भविष्यात या बाबत कोणतेही अंतर्गत वाद होणार नाही या अटीच्या अधीन राहून त्याऐवजी **परिशिष्ट "अ"** मधील अ.क्र.७ येथील ता. गेवराई, जिल्हा बीड येथे ग्रामपंचायतीचे नांवात खालील रकान्यामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	जिल्हा	तालुका	ग्रामपंचायतीचे नाव	कामाचे नांव	मंजूर निधी (रू. लक्ष)
७	बीड	गेवराई	जातेगाव	शादीखाना बांधणे	१०.००

२. या योजनेंतर्गत होणारा खर्च "मागणी क्र. झेड ई-१, २२३५ -सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२- समाजकल्याण, १९८-ग्रामपंचायतींना सहाय्य, राज्य योजनांतर्गत योजना, ०१ अल्पसंख्याकांना सहाय्य, (०१) (०१) अल्पसंख्याक बहुल ग्रामपंचायतींना सहायक अनुदान (२२३५ बी ०८५)" या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या वर्षाकरीता शासन निर्णय दि.११/१२/२०१७ अन्वये मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात येईल.

३. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२१२१२०१५४३५१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dinesh M. Sonavane

Digitally signed by Dinesh M. Sonavane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=9cabb099fd0576208f4caa310d2e7860201ab5363a2133e0927ff26c0f016fdf,
2.5.4.45=032100CD9D66225CED8BAE27E0E1249D39EC14A54419D0A13504B49333B23F92B58199, cn=Dinesh M. Sonavane
Date: 2018.02.12 12:35:42 +05'30'

(दि. मा. सोनवणे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
४. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव सर्व मंत्रालयीन विभाग,
५. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर,
६. महालेखापाल १/२ (लेखापरीक्षा) , मुंबई / नागपूर,
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
९. संबंधित जिल्हाधिकारी/ मुख्य कार्यकारी अधिकारी, संबंधित जिल्हा परिषद
१०.संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी, संबंधित जिल्हा परिषद
११.मा.मंत्री/ राज्यमंत्री (अल्पसंख्याक विकास) यांचे खाजगी सचिव,
१२. सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई,
१३.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय (प्रसिध्दीसाठी),
१४.निवडनस्ती